ePaper


**नागपुरात शिस्तप्रिय भाजपमध्ये बंडखोरी, गडकरी-फडणवीसांची डोकेदुखी वाढणार!**


वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 05 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!







शिव-शंभू विचारांचा गगनभेदी निनाद...
पिंपरी-चिंचवडच्या गिनीज विश्वविक्रम!

## डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून 'सुपर इंटेलिजन्स फोर्स'च्या स्थापनेची मोठी घोषणा

# अमेरिकेत AIचे नाव बदलले




**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी एक मोठी घोषणा केली होती. ट्रम्प यांनी थेट 'एआय'चं नाव बदललं आणि नव्या नावाच्या प्रस्तावावर स्वाक्षरी देखील केली होती. डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या सीईओंबरोबर घेतलेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला. 'एआय'चं नाव आता 'एसआय' (SI) असं करण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतलेला आहे.**

यानंतर आता ट्रम्प यांनी आणखी एक मोठी घोषणा केली. ट्रम्प यांनी 'सुपर इंटेलिजन्स फोर्स'ची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) शर्यतीत अमेरिकेला कायम आघाडीवर ठेवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी 'सुपर इंटेलिजन्स फोर्स'ची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी या उपक्रमाचं वर्णन औद्योगिक क्रांतीपेक्षाही मोठे आणि इंटरनेट क्रांतीपेक्षाही अधिक महत्त्वपूर्ण पाऊल असं केलं आहे.

या संदर्भात ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर सविस्तर भाष्य केलं आहे. 'सुपर इंटेलिजन्स'च्या क्षेत्रात अमेरिकेचं जागतिक नेतृत्व टिकवून ठेवणं हे या फोर्सचं उद्दिष्ट असल्याचं ट्रम्प यांनी स्पष्ट केलं आहे.

"'सुपर इंटेलिजन्स'बाबत व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या ऐतिहासिक करारानंतर आता मी 'सुपर इंटेलिजन्स फोर्स' (SIF) च्या स्थापनेची घोषणा करत आहे. 'सुपर इंटेलिजन्स फोर्स'वर समन्वय साधण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या माध्यमातून आता 'सुपर इंटेलिजन्स'च्या क्षेत्रात अमेरिकेचं जागतिक नेतृत्व कायम राखलं जाईल. तज्ज्ञांच्या मते ही क्रांती औद्योगिक क्रांती आणि इंटरनेटपेक्षाही मोठी ठरणार आहे", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं.

"ही फोर्स ग्राहक, धार्मिक संस्था, महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा पुरवणारे घटक आणि 'सुपर इंटेलिजन्स' कंपन्या यांच्याशी फेडरल सरकारच्या संवादाचा व सहकार्याचा समन्वय साधण्याचं काम करेल. त्यानंतर ही फोर्स मला म्हणजे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना आणि 'चीफ ऑफ स्टाफ' यांना अहवाल सादर करेल", अशी माहिती ट्रम्प यांनी दिली.



## 'एआय' आता कोणत्या नावाने ओळखलं जाणार?

डोनाल्ड ट्रम्प यांनी 'एआय'चं नाव बदललं असून नव्या नावाच्या प्रस्तावावर काही दिवसांपूर्वी स्वाक्षरी केली. ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या सीईओंबरोबर एक बैठक घेतली. या बैठकीत ट्रम्प यांनी एआय (AI) चं नाव बदलण्याचा निर्णय घेतला. 'एआय'चं नाव आता 'एसआय' (SI) असं करण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला. अमेरिकेच्या प्रशासनात 'एआय'चं नाव अधिकृतपणे बदलून 'एसआय' (सुपर इंटेलिजन्स) असं करण्यात आलं आहे. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या शब्दाऐवजी 'सुपर इंटेलिजन्स' हा शब्द तंत्रज्ञानाची खरी ताकद आणि क्षमता अधिक प्रभावीपणे दर्शवत असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यामुळे आता 'एआय' हे 'एसआय' या नावाने ओळखलं जाणार आहे.

# पुण्यातील खासगी विद्यापीठावर प्रशासक मंडळ नियुक्त!

## ताथवडे येथील श्री बालाजी विद्यापीठावर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रशासक मंडळ नियुक्त

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील ताथवडे येथील श्री बालाजी विद्यापीठ या खासगी स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठावर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांची मुख्य प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.**



उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. डिसेंबर २०२४ मध्ये संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी बी. थिलागावती यांची अध्यक्षपदी झालेली निवड कायदेशीरदृष्ट्या वादात सापडली होती. श्री बालाजी विद्यापीठ या विद्यापीठाच्या विश्वस्त संस्थेतील (ट्रस्ट) अंतर्गत वादामुळे दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाला होता. या प्रकरणात राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते.

न्यायालयाच्या निर्णयानुसार या प्रकरणात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकाराने राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप केला. विद्यापीठाचे कामकाज सुरळीत होण्यासाठी शासनाने उच्च न्यायालयात प्रभावीपणे बाजू मांडली. त्यानंतर उच्च न्यायालयाने या प्रकरणात विद्यापीठावर प्रशासक मंडळ नियुक्त करण्याचा आदेश दिल्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले.

प्रशासक मंडळामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांची मुख्य प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या मुख्य वित्त व लेखा अधिकारी डॉ. चारुशीला गायके, 'सीओईपी'चे अधिष्ठाता पराग सदगीर यांचाही प्रशासक मंडळात समावेश आहे. प्रशासक मंडळाने तत्काळ विद्यापीठाची सूत्रे हाती घेतली. विद्यापीठाच्या प्रश्नांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी आंदोलनस्थळी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेतल्या. प्रशासक मंडळाच्या माध्यमातून येत्या काळात विद्यापीठाचे दैनंदिन शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज पूर्णपणे सुरळीत होईल, असे नमूद करण्यात आले. प्रशासक मंडळाने नियुक्तीनंतर तत्काळ विद्यापीठाची सूत्रे स्वीकारली. विद्यापीठातील विविध प्रश्न आणि अडचणींबाबत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी प्रशासक मंडळाने आंदोलनस्थळी जाऊन संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विद्यापीठाच्या कारभाराशी संबंधित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देण्याची भूमिका प्रशासक मंडळाकडून घेतली जात आहे. विद्यापीठातील प्रशासन सुरळीत झाल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम कमी होण्यास मदत होईल. प्रशासक मंडळाच्या माध्यमातून विद्यापीठातील प्रलंबित प्रश्न सोडवून दैनंदिन कारभार पूर्णपणे सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. राज्य शासनानेही विद्यार्थ्यांचे हित आणि विद्यापीठाचे शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे आगामी काळात प्रशासक मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या निर्णयांकडे विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### शैक्षणिक कामकाज सुरळीत करण्यावर भर

श्री बालाजी विद्यापीठाच्या दैनंदिन शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासक मंडळ काम करणार आहे. विद्यापीठातील अंतर्गत वादाचा परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये, तसेच परीक्षा, प्रवेश, शैक्षणिक प्रक्रिया आणि इतर प्रशासकीय बाबी नियमितपणे सुरू राहाव्यात, यासाठी आवश्यक पावले उचलली जाण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार झालेल्या या नियुक्तीमुळे श्री बालाजी विद्यापीठाच्या प्रशासनाला तात्पुरते स्थैर्य मिळण्याची शक्यता आहे.

# पुण्यातील MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत शरद पवारांचा मुख्यमंत्री फडणवीसांना फोन

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू केलं आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील गोंधळ, पेपरफुटी, रखडलेल्या भरती प्रक्रिया आणि एमपीएससी आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा अशा विविध मुद्यांवरून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन सुरू केलं आहे.**





या आंदोलनाला आज तीन दिवस झाले आहेत. मात्र, अद्यापही राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

एमपीएससीच्या या विद्यार्थ्यांचं हे 'सत्याग्रह आंदोलन' राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरू आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या काही प्रतिनिधींनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी शरद पवारांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या मागण्यासंदर्भात शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला आणि विद्यार्थ्यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांना सांगितल्या. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याचं आवाहन शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलं आहे. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधावा आणि त्यांच्या मागण्यांचा विचार करावा. विद्यार्थ्यांना न्याय देण्याची सरकारची नैतिक जबाबदारी आहे', अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

"विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन मार्ग काढला जावा, यासाठी मी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. मात्र, देवेंद्र फडणवीस हे आज मुंबईत नाहीत, ते नागपूरला आहेत. ते बहुतेक उद्या सकाळी मुंबईला येतील. मुख्यमंत्री फडणवीसांना मी विनंती केली की, तुम्ही मुंबईत आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष घाला. विद्यार्थ्यांशी संवाद साधा. जर आवश्यकता असेल तर तुम्ही आणि विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी चर्चा करा. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी जे शक्य आहे ते सर्व करण्याचं आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुचवलं. आता ते उद्या मुंबईत आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत भूमिका मांडतील.

### शरद पवार काय म्हणाले?

"माझ्याकडे विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी आले होते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत आणि त्यांच्या मागण्याबाबत मार्ग निघायला हवा. सुसंवाद असायला हवा. एका बाजूने राज्याचे मुख्यमंत्री किंवा त्यांचे सहकारी आणि दुसऱ्या बाजूने विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी यांच्यात चर्चा व्हावी. मात्र, जर चर्चा झाली नाही तर प्रश्न सुटणार नाहीत. कोणताही प्रश्न सुटायचा असेल तर सुसंवाद असायला हवा", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# शिव-शंभू विचारांचा गगनभेदी निनाद... ...पिंपरी-चिंचवडचा गिनीज विश्वविक्रम!

## ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ला विश्वविक्रमी ढोल-ताशा ऐतिहासिक मानवंदना

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पाच हजाराहून अधिक ढोलांचा एकसंध ठेका, सलग पाच मिनिटांचे शिस्तबद्ध सामूहिक वादन आणि शिव-शंभूंच्या जयघोषाने पिंपरी-चिंचवडमध्ये रविवारी ऐतिहासिक क्षण साकारला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ला विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना सोहळा रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडला. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या सोहळ्यात एकाच वेळी सर्वाधिक ढोल वाजविण्याचा विश्वविक्रम नोंदविण्यात आला. या कामगिरीची ‘गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स’मध्ये नोंद झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.**





> “धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ला हजारो ढोल-ताशांच्या निनादातून अर्पण केलेली ही मानवंदना म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्य, संस्कृती आणि एकजुटीचा अभिमानास्पद आविष्कार आहे. वादकांची शिस्त, पथकांचा समन्वय आणि शिव-शंभूप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विश्वविक्रमाचा संकल्प साकार झाला. या यशाचे खरे मानकरी सर्व वादक, पथकप्रमुख, स्वयंसेवक, सहकारी आणि संस्कृती प्रेमी नागरिक आहेत. शिव-शंभूंच्या विचारांची प्रेरणा घेऊन सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच व्यसनमुक्त आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक समाज घडविण्यासाठी आपण एकत्र काम करूया!”
>
> - महेश लांडगे, आमदार तथा अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.

### गोमाता सन्मान अभियानाची जागृती; नशामुक्तीची प्रतिज्ञा

सोहळ्याच्या निमित्ताने ‘गोमाता सन्मान अभियान’विषयी जनजागृती करण्यात आली. सांस्कृतिक सादरीकरणांसोबत सामाजिक बांधिलकीचा संदेश देत ‘नशामुक्त भारत अभियान’अंतर्गत सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजात जागृती करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. संपूर्ण ‘वंदे मातरम्’च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात आली. हजारो वादकांची शिस्त, पथकांचा समन्वय आणि शिव-शंभूप्रेमींच्या सहभागातून साकारलेला हा विश्वविक्रम पिंपरी-चिंचवडच्या सांस्कृतिक इतिहासातील अभिमानाचा क्षण ठरला.

### तीन संधी; पाच मिनिटांच्या शिस्तबद्ध वादनातून विक्रम

विश्वविक्रमाच्या प्रयत्नासाठी वादकांना तीन संधी उपलब्ध होत्या. एकाच वेळी सर्वाधिक ढोलांचे सलग पाच मिनिटे शिस्तबद्ध वादन करणे हे या प्रयत्नाचे प्रमुख उद्दिष्ट होते. सामूहिक वादनातील एकसंधपणा, ठेक्यातील सातत्य आणि समन्वय राखत पथकांनी विश्वविक्रमाचा संकल्प पूर्णत्वास नेला. विविध पथकांतील हजारो वादकांनी एकत्र येत महाराष्ट्राच्या रणवाद्य परंपरेची ताकद दाखवून दिली. ढोल-ताशांच्या गगनभेदी निनादातून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याला मानवंदना अर्पण करण्यात आली. भारतमाता ची मनमोहक रंगावली रेखाटण्यात आली होती.

### शिव-शंभूंचा जयघोष; राष्ट्रभक्तीचा जागर

‘हर हर महादेव’, ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’, ‘धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय’, ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’ अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा ठेका आणि उपस्थितांचा जयघोष यातून शिव-शंभूंच्या पराक्रमाला वंदन करण्यात आले. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यात शौर्य, सांस्कृतिक परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळाला. गतवर्षीच्या मानवंदनेची प्रेरणा घेऊन यंदा अधिक व्यापक सहभागातून विश्वविक्रम साकारल्याचे आयोजकांनी नमूद केले.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात महाराष्ट्रभरातील पथकांनी सहभाग घेतला. मोशी, स्पाईन रोड आणि वाघेश्वर मंदिर, चऱ्होली अशा तीन ठिकाणी ढोल-ताशांचे वादन करण्यात आले. यापूर्वी 2 हजार 650 ढोल-ताशा वादनाचा विश्वविक्रम होता. पिंपरी-चिंचवडमध्ये आता 4 हजार 112 ढोल-ताशा वादनाचा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आले.

सोहळ्याची सुरुवात स्वागत आणि प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर शिवशंभो गर्जना सादर झाली, गो सन्मान आवाहन अभियान राबवण्यात आले आणि मर्दानी खेळांनी उपस्थितांची मने जिंकली. गिनीज रेकॉर्डच्या तयारीसाठी ढोल-ताशा पथकांची मांडणी करण्यात आली, त्यानंतर पुन्हा शिवशंभो गर्जना झाली. शंखनादानंतर छत्रपती संभाजी महाराजांना ढोल-ताशांच्या गजरात मानवंदना देण्यात आली.

यानंतर मर्दानी खेळ, शाहीर चंद्रकांत माने यांचे शाहिरी सादरीकरण, विशेष कविता सादरीकरण आणि शिवशंभूगर्जना सादर झाली. शाहीर खुपिरे यांनी आपल्या खास शैलीत सादरीकरण केले, तसेच ढोल-ताशा महासंघाच्या वतीने मनोगत व्यक्त करण्यात आले. उपस्थितांनी नशामुक्त भारताची सामुदायिक प्रतिज्ञा घेतली. आमदार महेश लांडगे यांनी संबोधन करून संपूर्ण “वंदे मातरम्” गायनाचे आवाहन केले. त्यानंतर गिनीज रेकॉर्डबाबत माहिती देण्यात आली आणि सामूहिक ढोल-ताशा सेलिब्रेशन झाले. शाहीर खुपिरे यांनी धनगर ओव्या सादर केल्या. समारोपात उपस्थितांचे आभार मानण्यात आले आणि पुढील वर्षी रविवार, १९ सप्टेंबर २०२७ रोजी याच ठिकाणी हा कार्यक्रम नव्या उत्साहात आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला.



## भूमिका

**घरातून आनंदाने सहलीला गेलेली मुले पुन्हा कधीच परतणार नाहीत, यापेक्षा पालकांसाठी क्रूर आघात कोणता असू शकतो? दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून झालेला मृत्यू कुटुंबीयांना अक्षरशः दुःखाच्या सागरात लोटणारा आहे. मुलांच्या ऐवजी घरी पोहोचलेली निःशब्द पार्थिवे आणि मागे उरलेला पालकांचा आक्रोश कोणत्याही सांत्वनाने शांत होणार नाही.**

# सहलीचा आनंद; आठ कुटुंबांवर दुःखाचा डोंगर

या दुःखापुढे शब्द अपुरे आहेत; मात्र अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी कृती अपुरी राहता कामा नये. आळंदीतील खासगी क्लासने आयोजित केलेल्या सहलीत ४२ विद्यार्थी आणि सहा शिक्षक होते. त्यापैकी समुद्रात उतरलेल्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. पाण्याची खोली, भरती आणि समुद्रातील प्रवाहाचा अंदाज चुकल्याने दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

मात्र नेमकी चूक कुठे झाली, कोणती खबरदारी घेतली गेली नाही आणि विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्याची परवानगी कशी देण्यात आली, हे चौकशीत स्पष्ट झाले पाहिजे. अल्पवयीन मुलांकडून समुद्राच्या धोक्याचे अचूक आकलन अपेक्षित करता येत नाही. त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची जबाबदारी सोबतच्या प्रौढांचीच असते.



दुर्दैवाने अशा घटना नवीन नाहीत. काही वर्षांपूर्वी मुरुडच्या समुद्रात सहलीला आलेल्या पुण्यातील १४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. दुर्घटना घडते, शोक व्यक्त होतो, चौकशीची घोषणा होते आणि खबरदारीचे आवाहन केले जाते; मात्र काही काळानंतर परिस्थिती पुन्हा पूर्ववत होते. मागील दुर्घटनेतून पुढील सहलीने कोणता धडा घेतला, याची खातरजमा होत नाही. ही कार्यपद्धती बदलण्याची वेळ आली आहे. विद्यार्थी सहली बंद करणे हा उपाय नाही. वर्गाबाहेरील शिक्षण, निसर्गाचा परिचय आणि सामूहिक अनुभव विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्त्वाचे आहेत. मात्र सहलीचे नियोजन करताना सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. सहलीपूर्वी ठिकाणाची जोखीम, हवामान, स्थानिक प्रशासनाच्या सूचना आणि संभाव्य धोके तपासणे बंधनकारक असावे. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेसे जबाबदार पर्यवेक्षक नेमले जावेत आणि प्रत्येक गटाची जबाबदारी स्पष्टपणे निश्चित केली जावी.

समुद्र, नदी, धरण किंवा धबधब्याजवळील सहलींसाठी विशेष कठोर नियम आवश्यक आहेत. सुरक्षित क्षेत्र निश्चित केलेले नसेल, प्रशिक्षित जीवरक्षक आणि आवश्यक बचावसाधने उपलब्ध नसतील तर विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्यास परवानगी देऊ नये. पोहता येणे म्हणजे समुद्राच्या अनिश्चित प्रवाहावर मात करता येणे नव्हे. स्थानिक प्रशासनानेही केवळ सूचना फलक लावून जबाबदारी संपवू नये; प्रत्यक्ष जीवरक्षक आणि तत्पर बचावव्यवस्था उपलब्ध असावी. या दुर्घटनेची चौकशी निष्पक्ष आणि कालबद्ध होणे आवश्यक आहे. निष्काळजीपणा सिद्ध झाल्यास जबाबदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर दुर्घटनेतून वाचलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक आधार आणि समुपदेशन मिळाले पाहिजे. या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू आणखी एका दुःखद बातमीपुरता मर्यादित राहू नये. त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे पुढील प्रत्येक सहलीत सुरक्षिततेचे नवे निकष प्रत्यक्षात उतरवणे. प्रत्येक सहलीनंतर पालकांना त्यांचे मूल सुखरूप परत मिळणे, हाच त्या सहलीचा खरा यशस्वी समारोप आहे.

## प्रासंगिक »

### हरवलेली वही

**एका गावात आरव नावाचा मुलगा राहत होता. तो अभ्यासात हुशार होता; मात्र वस्तूंची काळजी घेण्याची त्याला सवय नव्हती. एके दिवशी शाळेतून घरी येताना त्याची महत्त्वाची वही कुठेतरी पडली. त्या वहीत परीक्षेची सर्व तयारी लिहिलेली होती.**

आरवने रस्त्यावर खूप शोध घेतला, पण वही सापडली नाही. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर त्याला कळले की, गावातील एका वृद्ध आजोबांना ती वही सापडली होती. त्यांनी वहीतील नाव पाहून आरवला शोधून ती परत केली.

आरवने कृतज्ञतेने आजोबांचे आभार मानले. आजोबा म्हणाले, "ही वही तुझी होती, म्हणून ती तुला परत करणे माझे कर्तव्य होते. पण यापुढे वस्तूंची काळजी घे. हरवलेली वस्तू पुन्हा मिळेलच असे नाही."

त्या दिवसापासून आरवने आपले पुस्तक, वही आणि इतर वस्तू नीट सांभाळण्यास सुरुवात केली. त्याला समजले की, चूक झाल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा आधीच काळजी घेणे अधिक शहाणपणाचे असते.

- तात्पर्य : निष्काळजीपणामुळे नुकसान होते; जबाबदारीने वागल्यास अनेक अडचणी टाळता येतात.

**औषध हा चैनीच्या वस्तूंचा विषय नाही आणि रुग्ण हा सामान्य बाजारातील ग्राहक नाही. त्यामुळे आरोग्य क्षेत्रात मुक्त बाजाराचे नियम जसेच्या तसे लागू करता येणार नाहीत.**

# एमआरपीचा खेळ अन् रुग्णांची लूट

जीवनरक्षक कर्करोगावरील एका औषधाची विक्रेत्याला किंमत २,७०० रुपये, तर त्याच औषधाची छापील कमाल किरकोळ किंमत २७,००० रुपये असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आल्यानंतर न्यायालयाने रुग्णांच्या लुटीबाबत केलेली टिप्पणी अत्यंत गंभीर आहे. औषधांच्या किमतीतील ही तफावत केवळ व्यापारी नफ्याचा विषय नसून आरोग्यव्यवस्थेतील पारदर्शकतेचा प्रश्न आहे.

महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनीही केंद्रीय प्राधिकरणाला पाठविलेल्या अहवालात रुग्णालयांमधील वैद्यकीय साहित्याच्या किमतीतील मोठ्या फरकाकडे लक्ष वेधले आहे. ११ रुपयांना खरेदी केलेला आयव्ही सेट ३२५ रुपयांना, तर ६ ते ७ रुपयांची सिरिंज ५७ रुपयांपर्यंत आकारली जात असल्याचे त्यात नमूद आहे. अशा व्यवहारात रुग्णाला पर्याय नसल्याचा फायदा घेतला जात असेल, तर त्यावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. विशेषतः गंभीर आजार, शस्त्रक्रिया



किंवा अतिदक्षता विभागातील उपचारांदरम्यान रुग्ण आणि नातेवाईक मानसिकदृष्ट्या असहाय असतात. अशा वेळी औषधे, इंजेक्शने, स्टेंट, कॅथेटर आणि सर्जिकल साहित्य यांची किंमत तपासण्याची त्यांची क्षमता मर्यादित असते. त्यामुळे रुग्णालयातील औषधविक्री आणि बिलिंगमध्ये पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. भारताने औषधांच्या किमती नियंत्रित करण्यासाठी अनेकदा प्रयत्न केले आहेत. औषध किंमत नियंत्रण आदेश आणि राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाच्या माध्यमातून अत्यावश्यक औषधांच्या किमती निश्चित केल्या जातात. मात्र सर्व औषधे आणि वैद्यकीय साहित्य या नियंत्रणाच्या कक्षेत येत नाहीत. उत्पादनाची वास्तविक किंमत आणि एमआरपी यातील मोठ्या फरकावरही प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे.

रुग्णालयांनी औषधांची खरेदी किंमत आणि रुग्णाकडून आकारलेली किंमत स्पष्टपणे दाखवावी. बिलावर एमआरपीसोबत प्रत्यक्ष खरेदी किंमत नमूद करणे बंधनकारक करावे. औषधे, सर्जिकल साहित्य आणि वैद्यकीय उपकरणांवरील नफ्याची वाजवी मर्यादा निश्चित करण्याबाबतही सरकारने विचार करावा. जनऔषधी केंद्रांचे जाळे मजबूत करणे आणि जनरिक औषधांच्या वापराला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

रुग्णाच्या असहायतेतून अवाजवी नफा कमावणे कोणत्याही सुसंस्कृत आरोग्यव्यवस्थेला शोभणारे नाही. उपचार परवडण्याजोगे आणि पारदर्शक असतील, तरच 'आरोग्याचा अधिकार' प्रत्यक्ष अर्थाने नागरिकांपर्यंत पोहोचेल. रुग्णाच्या वेदनेवर बाजारपेठ उभी राहू नये, एवढीच अपेक्षा.

## ।। अभंगवाणी ।।



मृगजळ दिसे साचपणा ऐसें ।
खोटियाचें पिसें ऊर फोडी ॥१॥

जाणोन कां करा आपुलाले घात ।
विचारा रे हित लवलाहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजपाकडून शिक्षक मतदारसंघासाठी उमेदवारांची घोषणा!

## विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने आपल्या ३ उमेदवारांची अधिकृत यादी केली जाहीर

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना मोठा वेग आला आहे. काँग्रेसपाठोपाठ आता भारतीय जनता पक्षानेही आपल्या तीन उमेदवारांची घोषणा केली आहे. महायुतीत निर्माण झालेली रस्सीखेच दूर करत भाजपाने पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदारसंघांवर आपले उमेदवार निश्चित केले आहेत.**


भारतीय जनता पार्टी
केन्द्रीय कार्यालय
6ए, दीनदयाल उपाध्याय मार्ग, नई दिल्ली-110002
फोन: 011-23500000 फैक्स: 011-23500190
दिनांक: 04.10.2026

प्रेस विज्ञप्ति

भारतीय जनता पार्टी की केंद्रीय चुनाव समिति ने महाराष्ट्र में होने वाले स्नातक और शिक्षक निर्वाचन क्षेत्रो के विधान परिषद् चुनाव 2026 हेतु निम्नलिखित नामों पर अपनी स्वीकृति प्रदान की है।

महाराष्ट्र विधान परिषद चुनाव 2026

| क्र. | स्नातक और शिक्षक निर्वाचन क्षेत्र का नाम | उम्मीदवार का नाम |
|---|---|---|
| 1. | पुणे विभाग स्नातक Pune Division Graduates' | डॉ० (श्रीमती) स्मिता योगेश जाधव Dr. (Smt.) Smita Yogesh Jadhav |
| 2. | नागपुर विभाग स्नातक Nagpur Division Graduates' | श्री सुधाकर विठ्ठलराव कोहळे Shri Sudhakar Vitthalrao Kohle |
| 3. | पुणे विभाग शिक्षक Pune Division Teachers' | श्री कौस्तुभ मुरलीधर गावडे Shri Kaustubh Muralidhar Gawde |

BHARATIYA JANATA PARTY Central Office Tel:23500000
(तरुण चुघ)
सांसद (राज्य सभा) एवं
राष्ट्रीय मुख्यालय प्रभारी

1

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून भाजपाचे निष्ठावंत नेते सुधाकर कोहळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील 'रामगिरी' बंगल्यावर झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर त्यांची उमेदवारी निश्चित झाली. या मतदारसंघात त्यांची थेट लढत काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजित वंजारी यांच्याशी होणार आहे.

राजकीय प्रवासासोबतच शैक्षणिक क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव, नागपूर महानगरपालिकेत भाजपाच्या तिकिटावर दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले तसेच त्यांनी पाणीपुरवठा सभापती म्हणून कार्यभार सांभाळला आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत दक्षिण-पूर्व नागपूर मतदारसंघातून काँग्रेसचे दिग्गज नेते सतीश चतुर्वेदी यांचा पराभव करत त्यांनी विधानसभेत धडक मारली होती. २०१९ मध्ये उमेदवारी नाकारली गेल्यानंतरही ते पक्षाशी एकनिष्ठ राहिले. २०२४ च्या निवडणुकीत पश्चिम नागपूरमधून त्यांना पराभव पत्करावा लागला; मात्र पक्षाने लगेचच त्यांच्यावर नागपूर पदवीधर मतदारसंघाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली.

पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपाने डॉ. स्मिता योगेश जाधव यांच्या रूपाने नवा चेहरा निवडणुकीच्या रिंगणात उतरवला आहे. त्यांनी पीएच. डी. (एज्युकेशन), एम.बी.ए. (फायनान्शियल मॅनेजमेंट) आणि बी.ई. (कॉम्प्युटर) असे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. पिंपरी-चिंचवड येथील डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या त्या प्र-कुलगुरू असून 'पुढारी पब्लिकेशन'च्या संचालक आणि 'टोमॅटो ९४.३ एफएम'च्या कार्यकारी संचालक आहेत. 'कस्तुरी क्लब'च्या माध्यमातून तब्बल १८ हजारांहुन अधिक महिलांचे नेटवर्क उभारून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांना 'वेणुताई चव्हाण युवती पुरस्कार', 'ग्लोबल वुमेन इन्स्पिरेशन अवॉर्ड' आणि 'एज्युप्रन्योर ऑफ द इयर' यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघासाठी महायुतीतील घटक पक्षांमध्ये जोरदार चर्चा सुरू होती. अखेर ही जागा भाजपाकडे आली असून पक्षाने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली आहे. एम.कॉम. (M.COM) आणि एम.बी.ए. (MBA) पदवीधारक. कोल्हापूर येथील प्रसिद्ध 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थे'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून ते कार्यरत आहेत. शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक आणि शिक्षणतज्ज्ञांच्या प्रश्नांची उत्तम जाण आणि त्यांच्यासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव त्यांना आहे. राज्य निवडणूक आयोगाने ३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला आहे. शेवटी, या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध मतदारसंघांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून उमेदवारांकडून तयारी सुरू झाली आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील मतदार नोंदणी, प्रचाराचे नियोजन आणि संघटनात्मक तयारीला आगामी काळात महत्त्व प्राप्त होणार आहे. राज्यातील या पाच मतदारसंघांच्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### भाजपाचे तीन अधिकृत उमेदवार

- पुणे पदवीधर मतदारसंघ: डॉ. स्मिता योगेश जाधव
- नागपूर पदवीधर मतदारसंघ: सुधाकर कोहळे
- पुणे शिक्षक मतदारसंघ: कौस्तुभ गावडे

# ठाकरे बंधूंच्या गर्जना मोर्चात 'गब्बर सिंग'ची एंट्री, ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईत आज ठाकरे बंधूंचा गर्जना मोर्चा आयोजित करण्यात आला होता. निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधू आक्रमक झाले आहेत. गेल्या काही वर्षांतील निवडणूक आयोगाच्या गोंधळाच्या कारभारावर आक्षेप घेण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. दुसरीकडे या मोर्चात गब्बरची एंट्री झालेल्या पाहण्यास मिळाली.**




### कार्यकर्त्याने नेमकं काय म्हटलं आहे?

मनोज निर्मळ नावाचा मनसे कार्यकर्ता गब्बरच्या वेशात या आंदोलनात सहभागी झाला होता. मनोज निर्मळ हे जालना या ठिकाणाहून मुंबईत आंदोलनासाठी आले आहेत. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला पाहिजे. ज्ञानेश कुमारने राजीनामा द्यावा नहीं तो गब्बर गोलीसे उडा देगा. असं म्हटलं आहे. १०० टक्के राजीनामा झाला पाहिजे. मतदान आम्ही केलं पण त्यात भ्रष्टाचार झाला आहे. लोकांचा जो हक्क आहे ज्याला मतदान केलं त्याला मत मिळालंच नाही. त्यामुळे हा घोटाळा करणाऱ्या ज्ञानेश कुमारांनी राजीनामा दिला पाहिजे. अशी मागणी गब्बरच्या वेशात आलेल्या मनोज यांनी केली. शोले या सिनेमाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. तरीही या सिनेमाचं गारूड आजच्या पिढीवरही कायम आहे.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, जोपर्यंत काँग्रेसचं सरकार होतं,तोपर्यंत आपण देखील भाजपसोबत वाहत गेलो होतो. मग त्यांनी काँग्रेस एवढा भ्रष्ट सरकार नाही, असं वातावरण केलं. पण आता संपूर्ण इंडिया उभा राहिलेला आहे, इंडिया अगेन्स्ट व्होट चोर. १३ कोटी मतदान तुम्ही अचानक गाळत आहात. बंगालमध्ये आतापर्यंत अवैध ठरलेल्या अर्जांची छाननी झाली, त्यातल्या काही लोकांना वैध ठरवले गेले आणि ती सुनावणी तिकडे सुरू आहे, पण उरलेल्या मतदारांची छाननी होऊन तो निकाल किंवा तपास पूर्ण व्हायला जवळपास १४६ महिने लागतील. हे प्रकरण इथपर्यंत थांबत नाही. मला सत्ताधारी पक्षाला एकच सांगायचं आहे की आम्हाला कुठलाही राग नाही किंवा आसूया नाही. तुम्ही सत्ता कशी राबवता आहात आणि कशातून राबवत आहात त्याचा आम्हाला राग आहे. लोकांनी ठरवावं की कुणाला सत्तेत बसवायचं आणि कुणाला विरोधात. लोकांनी ठरवलं पाहिजे, निवडणूक आयोगाने नाही. सध्या मनमानी कारभार सुरू आहे, एकाच उद्योगपतीला विमानतळं दिली, जंगलं दिली, पोर्ट दिले. काय चाललंय काय? आम्ही काही केलं तरी फरक पडत नाही हे निवडणूक आयोगाला बांधल्यामुळे होतं आहे. या देशातल्या जनतेने काहीही बोलावं, काहीही सांगावं, निवडणूक आयोग आमच्यासह असेल तर आम्ही मनाला येईल तसं वागू.

# इस्रायलच्या निवडणुकीत नेतान्याहूंची कसोटी

## युद्धाच्या पार्श्वभूमीवर इस्रायलमध्ये 'क्नेसेट' (संसद) निवडणुकांची रणधुमाळी सुरू

**महाईन्यूज । इस्रायल**

**इस्रायल गेल्या दोन वर्षांपासून युद्धाच्या छायेत आहे. गाझामधील भीषण संघर्ष, इराणसोबतचा तणाव आणि लेबनॉनमधील युद्धामुळे देशाची परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. याच काळात इस्रायलमध्ये आता 'क्नेसेट'च्या (एकसदनीय संसद) निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीत पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.**



इस्रायलमध्ये २७ ऑक्टोबरला 'क्नेसेट'च्या निवडणुका होणार आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या विनाशकारी हल्ल्यानंतर देशात होणारी ही पहिली राष्ट्रीय निवडणूक आहे. या काळात इस्रायलने गाझामध्ये मोठी लष्करी कारवाई केली, ज्यामुळे गंभीर मानवतावादी संकट निर्माण झाले. त्याचबरोबर इस्त्रालय, इराण आणि लेबनॉनमध्येही संघर्ष वाढला आहे.

यामुळे इस्त्रायलमधील लढत यंदा अटीतटीची ठरणार आहे. बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील पुराणमतवादी लिकूड पक्ष पुन्हा मैदानात उतरणार आहे. पुराणमतवादी लिकूड पक्षाने अति उजव्या आणि धार्मिकदृष्ट्या पुराणमतवादी पक्षांसोबत चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. मात्र जनमत चाचण्यांमध्ये दिसून आले आहे की, लिकूड पक्ष यंदा पिछाडीवर राहणार आहे. अद्याप युद्ध सुरू असल्याने नेतान्याहूंसमोर मतदारांचा विश्वास पुन्हा मिळवण्याचे आव्हान असणार आहे. तरीही नेतान्याहू यांचा राजकीय प्रवास पाहता त्यांना मात देणे सहज शक्य नाही. ते सर्वाधिक काळ इस्रायलचे पंतप्रधान राहिलेले आहेत आणि अनेकदा अनपेक्षित राजकीय युती करून त्यांनी सत्तेत पुनरागमन केले आहे, त्यामुळे यंदाची निवडणूक नेतान्याहूंसाठी आव्हानात्मक असली तरी निवडणुकीत त्यांचा राजकीय प्रभाव किती टिकतो याकडे जगाचे लक्ष असणार आहे.

निवडणुकीत नेमके काय होऊ शकते? इस्रायली मतदारांसाठी कोणते मुद्दे सर्वाधिक महत्त्वाचे आहेत? नेतान्याहू यांना पर्याय आहे का? युद्ध आणि हिंसाचार थांबवण्यावर कोणता पक्ष भर देणार आहे? वेस्ट बँकमध्ये इस्रायली वसाहतवाद्यांकडून सुरू असलेल्या हिंसाचाराबाबत राजकीय पक्षांची भूमिका काय आहे? नेतान्याहू यांच्या सरकारमधील कट्टर उजव्या विचारसरणीच्या नेत्यांचे पुढे काय होणार? तसेच इस्रायलमधील अरब नागरिकांमध्ये सध्या काय वातावरण आहे? दी इंडियन एक्स्प्रेसच्या मोइनुद्दीन अहमद यांनी या प्रश्नांवर प्रोफेसर तामार हर्मन यांच्याशी संवाद साधला. प्रोफेसर हर्मन या इस्रायल डेमोक्रसी इन्स्टिट्यूटच्या वरिष्ठ संशोधन फेलो असून 'व्हिटर्बी फॅमिली सेंटर फॉर पब्लिक ओपिनियन अँड पॉलिसी रिसर्च'च्या शैक्षणिक संचालक आहेत.

### इस्रायली मतदारांसाठी कोणते मुद्दे

इस्रायल डेमोक्रसी इन्स्टिट्यूटने ऑगस्टमध्ये केलेल्या एका सर्वेक्षणातून मतदारांसाठी कोणते मुद्दे महत्त्वाचे आहेत याचा अंदाज येतो. अपेक्षेप्रमाणे राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र संबंध हे प्रमुख मुद्दे असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले. त्याचवेळी अर्थव्यवस्था आणि वाढता जीवनावश्यक खर्च या मुद्द्यांवरदेखील मतदारांमध्ये अस्वस्थता आहे. मात्र, यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे ७ ऑक्टोबरच्या हल्ल्यांपूर्वी परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी लोकांचे मुख्यतः अर्थव्यवस्था आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींवर लक्ष होते. राजकीय पक्षांच्या प्रचारातही याच मुद्द्यांवर भर देण्यात आला.

---

# उत्तर प्रदेशात काँग्रेस-सपामध्ये जागावाटपावरून तणाव; काँग्रेस दबाव वाढवणार?

**महाईन्यूज । उत्तर प्रदेश**

**उत्तर प्रदेशात निवडणूकपूर्व घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेस आणि समाजवादी पक्षात जागावाटपावरून हालचाली सुरू झाल्या आहेत. यातच काँग्रेसने सहारनपूरचे खासदार इम्रान मसूद यांची उत्तर प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. जागावाटपाच्या चर्चेत काँग्रेस इम्रान मसूद यांना पुढे करत 'दबाव तंत्राचा' वापर करणार असल्याचे समाजवादी पक्षातील नेत्यांचे म्हणणे आहे.**




विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अधिक जागा मिळाव्यात म्हणून समाजवादी पक्षावर दबाव टाकण्यासाठी मसूद यांची नियुक्ती करण्यात आली, असे सपाच्या नेत्यांना वाटते, त्यामुळे समाजवादी पक्षात या निर्णयाबाबत अस्वस्थता असल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.

मात्र, समाजवादी पक्षाचे प्रवक्ते राजेंद्र चौधरी यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना नमूद केले की, इम्रान मसूद यांच्या नियुक्तीचा काँग्रेससोबत सुरू असलेल्या जागावाटपाच्या चर्चेवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, तरीही पक्षातील काही नेत्यांनी खासगीत या घडामोडीबाबत नाराजी आणि चिंता व्यक्त केली आहे.

सपाच्या एका नेत्याने म्हटले की, काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मनात नेमकं काय सुरू आहे हे स्पष्ट नाही. मात्र, नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आराधना मिश्रा मोना आणि त्यांचे वडील प्रमोद तिवारी यांचे समाजवादी पक्षासोबत चांगले संबंध आहेत, त्यामुळे त्यांच्या नियुक्तीमुळे उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठीची दोन्ही पक्षांमधील जागावाटपाबाबतची चर्चा सुरळीत होण्यास मदत होऊ शकते. याउलट, इम्रान मसूद यांनी सपा नेतृत्वाबाबत केलेली वक्तव्य आघाडीत अस्वस्थतेचे कारण ठरते असे या नेत्याने सांगितले.

सपा नेते पुढे म्हणाले, आता जागावाटपाच्या चर्चेत इम्रान मसूद यांना राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वाड्रा किती अधिकार देतात यावर पुढील समीकरण अवलंबून राहणार आहेत. जागावाटपावर लवकर निर्णय व्हावा अशी काँग्रेसची भूमिका आहे, कारण चर्चा लांबली तर समाजवादी पक्ष जेवढ्या जागा देईल, तेवढ्याच जागा स्वीकारण्याची वेळ काँग्रेसवर येऊ शकते असेही सपा नेते म्हणाले. सपाच्या एका वरिष्ठ नेत्याने दी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले, इम्रान मसूद यांची नियुक्ती म्हणजे काँग्रेसची दोन उद्दिष्टे साध्य करण्याची खेळी असू शकते.

### जागावाटपात अडथळे?

काँग्रेस आणि समाजवादी पक्षातील जागावाटपाच्या चर्चेत सहारनपूरमधील जागांचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो. गेल्या महिन्यात इम्रान मसूद यांनी म्हटले होते की, २०१७ मध्ये काँग्रेसने लढवलेल्या सहारनपूरमधील पाचही जागांवर पक्ष पुन्हा निवडणूक लढवेल. "हा आमचा मजबूत गड आहे, तो आम्ही असाच थोडी सोडणार." इम्रान मसूद यांच्या नियुक्तीवरून सपा नेत्यांनी व्यक्त केलेल्या नाराजीवर काँग्रेसच्या नेत्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. दोन्ही पक्षांमधील मतभेद लवकर दूर होतील अशी काँग्रेसला आशा आहे.

# दृश्यम 3 चा पहिल्या दोन दिवसांत मोठा विक्रम!




अभिनेता अजय देवगणच्या बहुप्रतीक्षित 'दृश्यम ३'ने चित्रपटगृहात प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर धूमाकुळ घातला आहे. चित्रपटाला पहिल्या दिवसापासून प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या दीड दिवसांत चित्रपटाने १०० कोटी रुपयांचा नेट कलेक्शनचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे 'दृश्यम ३'कडून आगामी काळात मोठ्या कमाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'दृश्यम'च्या याआधीच्या दोन्ही भागांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. त्यानंतर आता तिसऱ्या भागालाही प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसत आहे. सॅटनिलिकच्या आकडेवारीनुसार, 'दृश्यम ३'ने दुसऱ्या दिवशी तब्बल ५३.५० कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले. त्यामुळे चित्रपटाची देशांतर्गत एकूण कमाई ११५.५० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तर जागतिक स्तरावर चित्रपटाने १७७.१० कोटी रुपयांची कमाई केल्याचे सांगितले जात आहे. दोन दिवसांच्या कमाईचा विचार केला, तर 'दृश्यम ३' सध्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीत 'धुरंधर: द रिव्हेंज' पहिल्या, तर 'पुष्पा २' दुसऱ्या स्थानावर असल्याचे आकडेवारीतून समोर येते. 'दृश्यम ३'च्या कथेत पुन्हा एकदा विजय साळगावकरच्या बुद्धीचा आणि कुटुंबाला वाचवण्यासाठी तो आखत असलेल्या डावपेचांचा थरार दाखवण्यात आला आहे.



## ट्रम्प मामू, संपूर्ण जगाला आऊट ऑफ फ्रेम करायच्या मागे लागले

अभिनेता संजय दत्तने शेखर सुमन यांच्या 'शेखर टुनाइट' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. या शो दरम्यान संजय दत्तला जर तो पाच मिनिटांसाठी भारताचा पंतप्रधान झाला तर, अशी कल्पना दिली गेली होती. ज्यावर संजय दत्तने मुन्नाभाई स्टाईल भाषण करत देशवासीयांना संदेश दिला. इतकेच काय तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही निशाणा साधला. संजय दत्त यांनी नेत्यांचे फोटो, परदेश दौरे आणि ट्रम्प यांच्या टॅरिफ पॉलिसीवर 'गांधीगिरी'चा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. संजय दत्तने ५ मिनिटांसाठी स्वतःला देशाचे पंतप्रधान मानून जनतेला एक संदेश दिला. त्याने मुन्नाभाईच्या शैलीत हा संदेश देताना म्हटले, "माझ्या प्रिय देशवासियांनो, आज तुमचा पीएम बनून मला खूप आनंद झाला आहे. एवढा मोठा देश आहे, एवढे सगळे लोक आहेत आणि आता या सर्वांची जबाबदारी माझ्यावर आहे. पण तुम्ही लोकांनी अजिबात टेन्शन घ्यायचं नाही. मी हा आनंद साजरा करण्यासाठी परदेशात जाणार नाही. मी इथेच राहणारे, तुमच्या मध्ये नाहीतर पीएम आणि जनतेमध्ये कनेक्शन कसं तयार होणार?"



## राखी सावंत कोमल राणीवर भडकली

अभिनेता गोविंदा आणि अभिनेत्री कोमल राणी स्वर्णकार यांच्या नात्याबाबत सध्या मनोरंजन विश्वात जोरदार चर्चा सुरू आहे. दोघेही रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चांना उधाण आले असून, सार्वजनिक ठिकाणी दोघे एकत्र दिसल्याने या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. काही दिवसांपूर्वी गोविंदा आणि कोमल राणी यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले होते. यावेळीचे त्यांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. यावर मनोरंजन क्षेत्रातील काही कलाकारांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली मतं व्यक्त केली. काहींनी टीकाही केली होती. या टीकेला कोमल राणीने सोशल मीडियावरून सडेतोड शब्दांत उत्तर दिले होते. तिने एक लांबलचक पोस्ट शेअर करत टीका करणाऱ्यांना समज दिली. तसेच कोणाचा जळफळाट होत असेल तर होऊ दे, असेही तिने म्हटले होते. आता या संपूर्ण प्रकरणात अभिनेत्री राखी सावंतने उडी घेतली आहे. पापाराझींशी संवाद साधताना राखीने कोमल राणीवर थेट निशाणा साधला. "ही कोमल कोण आहे? ती माझ्याबद्दल आणि इतर सेलिब्रिटींबद्दलही वायफळ बडबड करत आहे." असं म्हणत तिच्यावर निशाणा साधला. तसेच माझ्या नादाला लागू नकोस मी सुनीता नाही, अशा शब्दांत फटकारलं. एवढ्यावरचं न थांबता राखीने कोमल राणीला 'नवरा चोरणारी' असं संबोधलं. याचवेळी राखीने गोविंदावरही नाराजी व्यक्त केली. "गोविंदाजी, संपूर्ण देश तुमच्यावर नाराज आहे. लहानपणापासून मी तुमचे चित्रपट पाहण्यासाठी जेवढे पैसे खर्च केले, ते आता परत हवे आहेत." अशी अजब मागणीही राखीने केली.

# शुभमन गिलचा ऐतिहासिक विक्रम!

## वेस्ट इंडिजविरुद्ध ३ वनडेत ३३४ धावा; ३००+ धावा करणारा दुसरा कर्णधार ठरला

**महाईन्यूज । मुंबई**

**भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका पार पडली. मालिकेतील सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली होती. यासह मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली. त्यानंतर तिसऱ्या वनडे सामन्यात वेस्ट इंडिजने दमदार पुनरागमन करत भारतीय संघावर विजय मिळवला. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुभमन हवी तशी कामगिरी करू शकला नाही. या सामन्यात तो एक धाव करून माघारी परतला. तरीदेखील त्याच्या नावे एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.**



या मालिकेतील तिन्ही सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलची बॅट चांगलीच तळपली. या मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये फलंदाजी करताना त्याने १६७ च्या सरासरीने ३३४ धावा चोपल्या. यादरम्यान त्याने २ दमदार शतकं झळकावली. ज्यामध्ये एक विक्रमी द्विशतकी खेळीचा समावेश होता. यासह तो ३ वनडे सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या कर्णधारांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. यासह गिल हा दुसराच कर्णधार बनला आहे, ज्याने ३ वनडे सामन्यांच्या मालिकेत फलंदाजी करताना ३०० हून अधिक धावा कुटल्या आहे.

याआधी झिम्बाब्वेच्या ब्रेंडन टेलरने वनडे क्रिकेटमध्ये ३ वनडे सामन्यांच्या मालिकेत फलंदाजी करताना ३०० धावांचा पल्ला गाठला होता. शुभमन गिलच्या आधी ३ वनडे सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय कर्णधारांच्या यादीत विराट कोहली अव्वल स्थानी होता. विराट कोहलीने २०१७ मध्ये न्यूझीलंड विरुद्ध झालेल्या मालिकेत फलंदाजी करताना २६३ धावा केल्या होत्या.

मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने ५० षटकांअखेर ७ गडी बाद ३५१ धावा केल्या होत्या. यादरम्यान केएल राहुलने १२९ धावांची शतकी खेळी केली. तर रोहित शर्माने ९२ आणि ऋतुराज गायकवाडने ५७ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करताना शे होपने विक्रमी १६२ धावांची खेळी करून वेस्ट इंडिजला विजय मिळवून दिला.

### ३ वनडे सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक धावा करणारे कर्णधार

- शुभमन गिल (भारत) – ३३४ धावा विरुद्ध वेस्ट इंडिज (२०२६)
- ब्रेंडन टेलर (झिम्बाब्वे) – ३१० धावा विरुद्ध न्यूझीलंड (२०११)
- शे होप (वेस्ट इंडिज) – २७८ धावा विरुद्ध भारत (२०२६)
- बाबर आझम (पाकिस्तान)- २७६ धावा विरुद्ध ऑस्ट्रेलिया (२०२१)
- कुर्रम खान (यूएई) – २७० धावा विरुद्ध अफगाणिस्तान (२०१४)

## वनडेनंतर आता भारत आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२०चा थरार रंगणार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका संपली आहे. यानंतर आता भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील टी-२० क्रिकेटची वेळ आली आहे. दोन्ही संघ पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहेत. याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या मालिकेतील पहिला सामना ६ ऑक्टोबर रोजी, तर अंतिम सामना १७ ऑक्टोबर रोजी खेळवला जाणार आहे. हे पाचही सामने वेगवेगळ्या शहरांमध्ये होणार आहेत. तर या मालिकेसाठी टीम इंडियातील काही खेळाडू बाहेर असणार आहेत. त्यांच्या जागी दुसऱ्या खेळाडूंना संधी मिळणार आहे. याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.**




भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील टी-२० मालिकेतील पहिला टी२० सामना ६ ऑक्टोबर रोजी लखनौमध्ये खेळला जाईल. भारत आणि वेस्ट इंडिज हे संघ भारतरत्नश्री अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर एकमेकांसमोर उभे येणार आहेत. हा सामना सायंकाळी ७:०० वाजता सुरू होणार आहे. दोन्ही संघांमधील दुसरा टी२० सामना ९ ऑक्टोबर रोजी रांची येथील जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियम कॉम्प्लेक्समध्ये खेळला जाईल. सामना सायंकाळी ७:०० वाजता सुरू होईल.

या मालिकेतील तिसरा सामना ११ ऑक्टोबर रोजी इंदूरमध्ये खेळला जाईल. हा सामना होळकर स्टेडियमवर आयोजित केला जाईल. हा सामना देखील सायंकाळी ७:०० वाजता सुरू होईल. दोन्ही संघ १४ ऑक्टोबर रोजी हैदराबादमध्ये दाखल होतील आणि राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सायंकाळी ७:०० वाजता चौथा टी२० सामना खेळवला जाईल. मालिकेतील पाचवा आणि अंतिम टी२० सामना १७ ऑक्टोबर रोजी बंगळूरुमध्ये खेळला जाईल. हा सामनाही एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सायंकाळी ७:०० वाजता सुरू होईल. तर आता या मालिकेतील प्लेइंग ११ बाबत मोठी माहिती समोर आली आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्याच्या तुलनेत टी२० सामन्यासाठीच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये भारतीय संघातील नऊ खेळाडू बाहेर असतील. यामध्ये कर्णधार शुभमन गिल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, केएल राहुल, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, गुरनूर ब्रार आणि अंशुल कंबोज यांचा समावेश आहे. टी-२० मालिकेत भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर असणार आहे. त्याने जपानमध्ये २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. याव्यतिरिक्त संघात वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, शिवम दुबे, ईशान किशन, संजू सॅमसन, रवी बिश्नोई आणि अर्शदीप सिंग यांसारखे खेळाडू असतील. एकदिवसीय संघाचा भाग असलेले कुलदीप यादव, नितीश कुमार रेड्डी आणि नमन धीर हे देखील टी-२० मालिकेत खेळताना दिसणार आहेत.

### भारताचा संभाव्य संघ:

अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, संजू सॅमसन, श्रेयस अय्यर (कर्णधार), इशान किशन, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग आणि प्रिन्स यादव/मयंक यादव.


SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
VLSI
Savitribai Phule Pune University
iCiT
EMPLOYABILITY
ENHANCEMENT
COURSES
Advance Course in
Embedded System Design with AI
Advance Course in
Data Analytics with AI
10000+
STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES
25 YEARS
OF EXPERIENCE IN EDUCATION
100%
PLACEMENT ASSISTANCE
APPLY NOW
www.icit.org.in 8669668900 / 8669668100 info@icit.org.in icitonline@gmail.com
VLSI Design and Research Centre
Department of Electronic and Instrumentation Science,
Savitribai Phule Pune University, Ganeshkhind, Pune – 411007.

# पुनावळेतील प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्राला नागरिकांचा विरोध

## प्रस्ताव रद्द करून पर्यायी जागा निवडण्याची मागणी; आरोग्य, पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षिततेबाबत चिंता

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्र अथवा ट्रान्सफर स्टेशनला नागरिकांनी विरोध दर्शविला आहे. दाट निवासी परिसरात अशा प्रकल्पामुळे आरोग्य, पर्यावरण आणि वाहतुकीवर संभाव्य परिणाम होऊ शकतात, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रस्ताव रद्द करून निवासी वस्त्यांपासून योग्य अंतरावर पर्यायी जागेचा विचार करावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.**






परिसरातील वाढती लोकसंख्या, गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि भविष्यातील विकास लक्षात घेऊन प्रकल्पाच्या जागेची निवड करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पुनावळेकरांचे आरोग्य आणि पुढील पिढ्यांचे हित सर्वोच्च प्राधान्याने जपावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

कचरा प्रकल्पामुळे उद्भवू शकणारी दुर्गंधी, प्रदूषण, कीटक व उंदरांचा उपद्रव आणि आवाज यांविषयी नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. प्रस्तावित जागेचा पर्यावरणीय व आरोग्यविषयक सखोल अभ्यास करून संभाव्य परिणाम स्पष्ट करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता असल्याने वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या संभाव्य धोक्याचाही स्वतंत्र अभ्यास करावा, असा नागरिकांचा आग्रह आहे. निवासी वस्त्या आणि शाळांच्या परिसरातील सार्वजनिक सुरक्षिततेचा विचार निर्णय प्रक्रियेत प्राधान्याने व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### नागरिकांशी चर्चा करूनच निर्णय घ्या..

प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी पुनावळेकर नागरिक, गृहनिर्माण संस्था आणि सामाजिक संघटनांशी सार्वजनिक चर्चा करण्यात यावी, अशी मागणी आहे. संबंधित सर्व अहवाल आणि निर्णय प्रक्रिया नागरिकांसमोर पारदर्शकपणे मांडावी. नागरिकांच्या हरकती व सूचना विचारात घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्रावरील विरोधाची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पर्यायी जागेचा विचार करताना आरोग्य, पर्यावरण, सुरक्षितता आणि परिसराच्या भविष्यातील विकासाला प्राधान्य द्यावे, असा पुनावळेकरांचा आग्रह आहे.

# जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयाचा डंका

**महाईन्यूज** I पिंपरी- चिंचवड

**संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल इंद्रायणीनगर येथे झालेल्या शालेय बॉक्सिंग जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी खेळाडूंनी विविध वजनी गटात 09 सुवर्णपदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे. त्यामुळे या सुवर्णपदक मिळवणाऱ्या सर्व खेळाडूंची प्रवरानगर, लोणी जिल्हा अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभाग स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.**



निकाल -17 वर्षाखालील मुले- 1) कु. रूद्र खामकर (50 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 2) कु. साईराज हळीकर (52 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 3)कु.मल्हार कपिले (54 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 4) कु.प्रज्वल सीतापुरे (63 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक

19 वर्षाखालील मुले व मुली- 1) कु. नीरज यादव (52 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 2)कु.पार्थ तांबेरे (75 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 3)कु. निश्चय जीनवाल (81 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 4) कु.प्राची वाघमोडे 48 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक 5) कु. चैत्राली लांडगे (52 किलोग्रॅम) प्रथम क्रमांक या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री अजित भाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर,पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# रायफल शूटिंगमध्ये दीपिका जगतापची चमकदार कामगिरी!

## १४५ गुणांसह १९ वर्षांखालील मुलींच्या ओपन साईट एअर रायफल प्रकारात उपविजेतेपद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वामी विवेकानंद रायफल शूटिंग रेंज, संभाजीनगर येथे पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. दीपिका गणेश जगताप (इयत्ता १२ वी विज्ञान) हिने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशाच्या जोरावर तिची विभागस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**



१९ वर्षांखालील मुलींच्या 'ओपन साईट एअर रायफल शूटिंग' प्रकारात दीपिकाने १४५ गुणांचा अचूक वेध घेत जिल्हास्तरावर उपविजेतेपद पटकावले. या चमकदार कामगिरीमुळे स्पर्धेतील अव्वल पाच खेळाडूंमध्ये स्थान मिळवून तिने शालेय विभागस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेचे तिकीट मिळवले आहे. दीपिका हिला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद सदाशिव करंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दीपिका जगताप हिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा भोसरीचे प्रथम आमदार विलासराव लांडे यांनी तिचे विशेष कौतुक करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे, विश्वस्त विक्रांत लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ. अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगीता गवस आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.






# शिवराम राघुजी ढोरे यांचे दुःखद निधन

**महाईन्यूज । इंदुरी**

येथील शिवराम राघुजी ढोरे यांचे दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने ढोरे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. शिवराम राघुजी ढोरे यांच्या पश्चात तीन मुले, पत्नी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. जेष्ठ नेते श्री. बबनराव राघुजी ढोरे यांचे ते कनिष्ठ बंधू तर पंचायत समिती सदस्य श्री. दिलीप नामदेव ढोरे यांचे ते चुलते होते. विद्यमान सदस्य श्री दत्तात्रय शिवराम ढोरे यांचे ते वडील आहे.

त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या प्रेमळ व मनमिळावू स्वभावाच्या आठवणींना उजाळा देत अनेकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

कै. शिवराम राघुजी ढोरे यांचा दशक्रिया विधी दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या मूळ गावी इंदूरी येथे इंद्रायणी काठी धार्मिक विधीनुसार संपन्न होणार आहे.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या स्वरदा यादवचा मल्लखांब स्पर्धेत प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्हा परिषद क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी स्वरदा यादव हिने मल्लखांब स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे तिची पुणे विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**



ज्ञान प्रबोधिनी विद्यालयात १७ वर्षांखालील वयोगटात ही स्पर्धा पार पडली. यामध्ये स्वरदा यादव हिने उत्कृष्ट लवचिकता आणि कौशल्याचे प्रदर्शन करत 'रोप मल्लखांब' आणि 'पोल मल्लखांब' या दोन्ही प्रकारांत सर्वाधिक गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले. स्वरदा हिला शाळेचे क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (PCET) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये नियमित अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांना विविध खेळांसाठी दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या क्रीडा संस्कृतीचा आणि नियमित सरावाचा स्वरदाला फायदा झाला, असे शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले.

स्वरदाच्या या यशाबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्वरदा यादव, मार्गदर्शक शिक्षक धनाजी पाटील आणि मुख्याध्यापिका पद्मावती बंडा यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.


YOU
CHOOSE
WE CARE
Consult with our experts now!
Orthopedic and Joint Care
Laboratory Services
24/7 Emmergency Care
128 Slice CT Sacn
3 Tesla MRI
Neuro and Spine Care
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com